# पोलिसाच्या सतर्कतेमुळे आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या महिलेला मिळाले जीवदान

देशोन्नती वृत्तसंकलन

नांदेड : बोंडार बायपास मार्गावरील पुलावरून गोदावरी नदीत उडी घेऊन आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका महिलेस या मार्गावरून पेट्रोलिंग करत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे जीवदान मिळाले असून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी त्या पोलिस कर्मचाऱ्याचा गौरव केला.

नांदेड पोलीस दलातील पोलीस अंमलदार शिवाजी बालाजीराव कोठाळे चार्ली पथक यांनी बोंडार बायपास पुलावर पेट्रोलिंग करताना एक महिला एकटीच पुलावर उभी होती व ती पुलावरून उडी मारण्याच्या तयारीत असल्याचे त्यांना दिसून आले. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता त्या महिलेला पुलाच्या कठड्यावरून खाली उतरवून त्या महिलेचे प्राण वाचवले. या कार्यामध्ये तत्परता दाखवल्याबद्दल



पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दखल घेऊन शिवाजी कोठाळे यांचा पोलिस अधीक्षक कार्यलयात केलेल्या कार्याबद्दल प्रशंसापत्र, ५ हजार रुपये रिवार्ड देऊन गौरव केला.

मराठवाडा नेता.



# महिलेचे प्राण वाचविणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यास बक्षीस

नांदेड : (म नेता)

शहरा जवळील बोंडार बायपास रस्त्यावरील पुलावरुन गोदावरी नदी उडी टाकून जीव देणार्या महिलेचा एका पोलिस अंमलदार यांनी जीव वाचविला असून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सदर कर्मचारी यास ५ हजार रुपयांचे बक्षीस देऊन गौरव केला आहे.

नांदेड पोलीस दलातील पोलीस अमलदार शिवाजी बालाजीराव कोठाळे हे चार्ली पथकात काम करतात...

होती. त्याचवेळी चार्ली पथक हे त्या ठिकाणाहुन गस्त घालत होते. सदरील घटना पोलिस अंमलदार शिवाजी कोठाळे यांच्या नजरेस पडतात त्यांनी तात्काळ गाडीच्या खाली उतरुन सदर महिलेस जीव देण्याचा प्रयत्न करत असतांना तिला वाचविले. त्यांनतर सदर महिलेस पोलिस ठाण्यात आणून तिच्या नातेवाईक यांच्या ताब्यात दिले.

सदरील घटना हि पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या...